महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १५ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## महत्वाचे

### टिटवाळा गोवेली रोडवर भरधाव पिकअप टेम्पोनं महिलेला चिरडलं

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** टिटवाळा गोवेली रस्ता परिसरातील घोटसई फाट्याजवळ भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव पिकअप टेम्पोने महिलेला चिरडले आहे. हि महिला या फाट्याजवळून जात होती. यादरम्यान, भरधाव पिकअप टेम्पोने महिलेला चिरडले. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. व्हिडिओमध्ये हा अपघात नेमका कसा घडला? हे स्पष्टपणे दिसून येत आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सुरेखा खंडागळे असे मृत महिलेचं नाव आहे. त्या टिटवाळा येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. हा भीषण अपघात टिटवाळा-गोवेली रस्ता जवळील घोटसई फाट्याजवळ घडला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरेखा खंडागळे या रस्त्याने पायी जात असताना अचानक वेगात आलेल्या पिकअप टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर महिला रस्त्यावर पडली असताना टेम्पो त्यांच्या अंगावरून गेल्याने हा अपघात अत्यंत भीषण ठरला. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. पिकअप टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

तर या घटनेची माहिती मिळताच शिवसेना उपशहर प्रमुख विजय देशेकर यांनी घटनास्थळी जाऊन जागेची पाहणी करत अपघात ग्रस्त सर्वच परिसरात कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने त्वरित सीसीटीव्ही लावावे आणि आरटीओ ने देखील वाहनांची तपासणी वेळोवेळी करावी. कल्याण तालुका पोलीस स्टेशनच्या अंतर्गत वाहतूक विभागाला जास्त कर्मचारी द्यावेत अशी मागणी केली. गुरुवारी दुपारी देखील पण वृंदा रोड साईडला एका गाडीने उडवलं त्यात दोन जण मयत झाले. एक लहान मुलगा आणि अजून एक इसम. तसेच धर्मवीर आनंद दिघे मार्गाला 75 वर्षाचे नागरिक यांना देखील एक रिक्षाने उडवला ते देखील सिरीयस आहेत. त्यामळे या मार्गावरून भरधाव वाहने चालवली जात असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले असून, वेगमर्यादा, स्पीड ब्रेकर आणि पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी देशेकर यांनी केली आहे.

### भिवंडीत व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी भव्य जनजागृती रॅली


**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी )** भिवंडी शहरात सामाजिक व धार्मिक उपक्रम करणाऱ्या गायत्री परिवार ट्रस्ट भिवंडीच्यावतीने व्यसनमुक्त भारत अभियान अंतर्गत शनिवारी शालेय विद्यार्थी व शिक्षक, नागरिकांना सोबत घेऊन भव्य जनजागृती रॅली काढण्यात आली होती. या प्रसंगी रॅलीमध्ये शेकडो विद्यार्थी,शिक्षक आणि नागरिकांनी सहभागी होत व्यसनमुक्त राहण्याची प्रतिज्ञा घेतली. समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवणे आणि युवा तरुणांमध्ये वाढत्या व्यसनाच्या प्रवृत्तीला प्रभावीपणे आळा घालण्यासाठी गायत्री परिवाराने हा कार्यक्रम घेतला असल्याची माहिती परिवाराचे पी.डी.यादव यांनी दिली.शनिवारी सकाळी गोपाळ नगर येथील दादासाहेब दांडेकर विद्यालया पासून सुरू झाली.कल्याण नाका आग्रारोड उड्डाणपुलाखालून कमला हॉटेल,धामणकर नाका या मार्गावरून ही रॅली पद्मश्री अण्णासाहेब जाधव विद्यालयात संपन्न झाली.झालेल्या समारोपाच्या कार्यक्रमात शांतीकुंज चे प्रतिनिधी सोमदेव पटय्या, प्राचार्य सुधीर घागस, समाजसेवक कृष्णगोपाल सिंग,पी.डी.यादव,मनफूल चौधरी,मंगेश यादव,अभिनय शर्मा,ॲड. डी.जी.सिंग,सुनील भोसले, नीरज गुप्ता,मनीष दुबे, पवन यादव,विपुल खंडेलवाल अदि मान्यवर नागरिक,विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी सर्व उपस्थितीतांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा घेतली.समाजात अंमली पदार्थांचे व्यसन वेगाने पसरत आहे आणि त्याचा परिणाम अगदी लहान मुलांपर्यंतही पोहोचला आहे त्यामुळे हे घातक व्यसन रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकांने पुढे येऊन जनजागृती करणे आवश्यक आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते प्राचार्य सुधीर घागस,समाजसेवक कृष्णगोपाल सिंग ठाकुर यांनी व्यक्त केले.दारू आणि अंमली पदार्थांच्या सेवनाच्या वाढत्या प्रमाणामुळे तरुणांमध्ये नैराश्य, निराशा, अपयश आणि असंख्य सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. हे मंद विष केवळ सामाजिक आरोग्याला हानी पोहोचवत नाही तर शरीराला कमकुवत करते आणि चैतन्य नष्ट करते त्यामुळे व्यवसना पासुन दुर ठेवण्यासाठी व्यसनमुक्ती मोहीम सर्वत्र प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे असे मत डॉ. वरुण मानेक यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्रनाथ दुसाने,आर.डी.देसाई यांनी केले.

### आमदार किसन कथोरेंच्या पाठपुराव्याला यश

# मुख्यमंत्र्यांकडून "लातूर ते बदलापूर" जनकल्याण द्रुतगामी मार्गाची घोषणा !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**




**बदलापूर :** इन्फ्रामॅन अशी ख्याती असलेले मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी 442 किमी लांबीच्या लातूर - बदलापूर कल्याण या द्रुतगती मार्गाची घोषणा केली आहे. लातूर - बदलापूर कल्याण द्रुतगती मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम लवकरच सुरु होणार असून अंदाजित 35 हजार कोटी रु. खर्चून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ च्या वतीने हा महामार्ग निर्माण केला जाणार आहे. लातूर जिल्ह्याच्या औद्योगिकरणासाठी आणि एकूणच कनेक्टिव्हिटीसाठी हा द्रुतगामी मार्ग नवसंजीवनी ठरणार आहे. या प्रकल्पाला जनकल्याण द्रुतगती मार्ग असे समर्पक नाव देण्यात आले आहे. 'लातूर ते बदलापूर -कल्याण महामार्गावरील वाहनांना पुढे कल्याण वरुन मुंबईला जाताना वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागू नये यासाठी सदरील रस्त्यात किंचित बदल करून लातूर - अहिल्यानगर - माळशेज घाट मार्गे बदलापूर - वडोदरा एक्स्प्रेस वे वरील बोगद्यातून पनवेल जेएनपीटीला जोडण्यात यावे, जेणेकरून वाहनांना अटल सेतू किंवा मुंबई - गोवा द्रुतगती मार्गावरून मुंबईत जाता येईल' यासाठी मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे व औसा विधानसभा मतदार संघांचे आमदार श्री. अभिमन्यू पवार सातत्याने पाठपुरावा करत होते.

6 ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री मा. श्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन तसे निवेदन दिले असता त्यांनी MSRDC चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमारजी गायकवाड यांना दिले होते.

कल्याण - लातूर द्रुतगती महामार्ग अंदाजे ४४२ किमी लांबीचा आहे. हा महामार्ग कल्याण येथून सुरू होऊन माळशेज घाटातून पुढे अहमदनगरला जाईल पुढे बीड, मांजरसुंबा, अंबेजोगाईवरून लातूरला येईल त्यामुळे कल्याण - लातूर प्रवास १० ते ११ तासांऐवजी चार तासात पूर्ण करता येणार आहे.



**“ आम्ही सुचवलेले बदल ग्राह्य धरूनच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. या संपूर्ण विषयात अनिलकुमारजी यांचीही महत्वाची आणि सकारात्मक भूमिका राहिली आहे. या प्रकल्पामुळे लातूर जिल्ह्याच्या विकासाला वायुगती प्राप्त होणार असुन मा. मुख्यमंत्री, दोन्ही मा. उपमुख्यमंत्री व मा. पालकमंत्री यांचे लातूर- बदलापूरकरांच्या वतीने आभार. बदलापूर - लातूर महामार्गमुळे बदलापूर अंबरनाथ तालुक्यासह मुरबाड तालुक्यातील गावांच्या विकासाला चालना मिळणार आहे. हा महामार्ग विदर्भ ते मुंबईला जोडणारा नवा महामार्ग असून त्याने विकासाला नवी दिशा मिळेल.**

■ **आमदार किसन कथोरे.**

## अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कडक बंदोबस्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ, ता. १४ (वार्ताहर)**

अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू होताच पोलिस प्रशासन पूर्णपणे सक्रिय झाले आहे. निवडणुकीत कोणताही गैरप्रकार घडू नये, यासाठी शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, मतदारांना प्रलोभने देण्याच्या प्रकारांवर पोलिसांची करडी नजर आहे. मतदारांना महा, रोख रक्कम किंवा अन्य भेटवस्तू देऊन प्रभावित करण्याचे प्रकार रोखणे हे या मोहिमेचा उद्देश आहे. त्यामुळे शहरात तीन प्रमुख ठिकाणी नियमित नाकाबंदी करून वाहन तपासणी सुरू आहे. पश्चिम भागात अंबरनाथ पोलिस ठाणे, तर पूर्व भागात शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या वतीने तपासणी करण्यात येत आहे. पोलिस आणि निवडणूक विभागाच्या संयुक्त पथकाकडून तपासणी केली जात आहे. यामध्ये संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शब्बीर सय्यद यांनी दिलेल्या माहितीनुसार अंबरनाथ पश्चिम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चिंचपाडा खदान येथील नालंबी मार्गावर नाकाबंदी सुरू आहे. चारचाकी, दुचाकी तसेच मालवाहू वाहनांची सखोल तपासणी करून चालकांची चौकशी केली जात आहे. संपूर्ण कारवाई ऑन-कॅमेरा होत असल्यामुळे पारदर्शकता राखली जात आहे. आचारसंहिता कालावधीत शहरात दिवसातून तीन ते चार वेळा वेगवेगळ्या ठिकाणी नाकाबंदी करून वाहन तपासणी केली जाईल.



# हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

**पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत**

### चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्रातच - मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

नागपुरात 8 डिसेंबरपासून सुरू झालेल्या राज्य विधिमंडळ हिवाळी अधिवेशनाचे अखेर आज रविवारी (दि.14 डिसेंबर) दुपारीच सूप वाजले. सत्तापक्ष, महायुती सरकारने हे अधिवेशन फलदायी ठरल्याचे तर विरोधकांनी हे अधिवेशन जमलेबाजी करणारे लक्षवेधी खूप पण विदर्भाकडे दुर्लक्ष करणारे, वांझोटे, मनपा निवडणुकीवर डोळा ठेवणारे होते. विदर्भाला कुठलाही न्याय मिळाला नाही. विदर्भातील जनतेच्या तोंडाला पाने पुसल्याचा आरोप केला. पुढील अधिवेशन सोमवार २३ फेब्रुवारीपासून मुंबईत होणार आहे. या अधिवेशनात ७२ तास ३५ मिनिटे कामकाज चालले. वाया गेलेला वेळ केवळ १० मिनिटे असून सात दिवसांच्या अधिवेशनात रोज सरासरी कामकाज १० तास २२ मिनिटे सभागृहात कामकाज झाले.

- **एकूण बैठका -७**
- **48 तास 16 मिनिटे कामकाज**
- **मंत्री नसल्यामुळे वाया गेलेले 40 मिनिटं**
- **शासकिय विधेयके संमत- 4 संमत**
- **एकुण उपस्थिती 75.47 टक्के**
- **शासकिय विधेयके संमत- ६ संमत**
- **सदस्य उपस्थित ९०. ९८ टक्के**
- **एकुण उपस्थिती ९४ टक्के**

**विधान परिषदेत ४ विधेयक संमत करण्यात आली. अधिवेशनात १ हजार ८६७ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या, त्यातील २९९ लक्षवेधी स्वीकारण्यात आल्या, तर ७० सूचनांवर चर्चा झाली. अधिवेशनात आमदारांची अधिकाअधिक ९०.९८ टक्के उपस्थिती होती, अल्प उपस्थिती ४३.८५ टक्के होती. एकूण सरासरी उपस्थिती ७५.९४ टक्के होती, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली.**

### कल्याण शहराच्या फॉरेस्ट कॉलनीत भर लोकवस्तीत कुत्रे पाळण्याचा व्यवसाय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिका प्रशासनाच्या डोळ्यात धूळ फेक करत, कल्याण शहरातील पश्चिमेतील बिर्ला कॉलेज जवळील फॉरेष्ट कॉलनीत पोल्ट नंबर 48 मधील बंगल्यात राहत्या घरात चक्क शेकडो कुत्रे एकत्र पाळण्याचा व्यवसाय बिन भोबाट सुरु आहे. फॉरेष्ट कॉलनीत लोकवस्ती आहे. येथील कुत्रे पाळण्याच्या व्यवसयामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. ही कुत्री दिवस रात्र ओरडतात, किंचालतात, रडतात त्यामुळे सततच्या या आरडा ओरडीने शेजारील नागरिक हैराण झाले आहेत. पोल्ट धारक श्री सप्रे यांना भाडे मिळते त्यामुळे ते शांत आहेत. भर लोकवस्तीत कुत्रे पाळण करणे हा गुन्हा आहे. मात्र कल्याण डोंबिवली महापलिका प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे शकडो कुत्रे एकत्र पाळली जात असल्यामुळे या कुत्र्यांना ही जाच होतो आहे. त्यात पाळीव कुत्रे येथे आणून ठेवली जातात त्यामुळे कुत्रे आपापसात भांडत असतात. त्याच भुकणे आणि परस्प्रावर ओरडणे शेजारी राहणाऱ्या नागरिकांना नकोसे करून ठेवले आहे. या बाबत शेजारील नागरिकांनी महापालिका प्रशासन, व खडकपाडा पोलिसांकडे तक्रार केली आहे. आता हे प्रशासन काय करते याकडे साऱ्याचे लक्ष लागले आहे.

# कल्याण - डोंबिवलीत भाजप-शिवसेना शिंदे गटाची महायुती पक्की !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली -** कल्याण डोंबिवली पालिकेत भाजपने गेल्या काही महिन्यांपासून स्वबळाचा नारा देणे सुरू केले होते. पालिकेवर भाजपचा महापौर बसेल, असे प्रदेश नेत्यांबरोबर स्थानिक नेते वल्गना करत होते. त्यामुळे कल्याण, डोंबिवली शहरात शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्या पालिकेतील युतीबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. पण, रविवारी डोंबिवलीत एका कार्यक्रमाच्या निमंत्रणाच्या जाहीर फलकांवर शिवसेना शिंदे गट, भाजप नेते, स्थानिक पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या एकत्रित प्रतिमा झळकल्याने कल्याण, डोंबिवलीतील महायुती घट्ट आणि पक्की झाल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाली आहे. गेल्या काही महिन्यांपासून कल्याण, डोंबिवलीत विकास कामांची उद्घाटने करताना भाजप पदाधिकाऱ्याचा कार्यक्रम असेल तर त्या कार्यक्रमाच्या फलकावर शिवसेना शिंदे गटाच्या एकाही नेता, पदाधिकाऱ्याची महायुती असुनही प्रतिमा नसायची. शिवसेना शिंदे गटाच्या विकास कामासंदर्भातील निमंत्रण पत्रिका, जाहीर फलकावर भाजप नेते, स्थानिक पदाधिकाऱ्यांची प्रतिमा नसायची. एखादा प्रभाग शिवसेना शिंदे गट नगरसेवकाचा असेल तर तेथे भाजपचा कार्यक्रम असेल तर स्थानिक शिवसेना नगरसेवकाला तेथे निमंत्रण नसायचे. तशीच परिस्थिती भाजपबाबत शिवसेनेकडून होती. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून कल्याण, डोंबिवलीत राज्यात युती असुनही शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये जोरदार कलगीतुरा रंगला होता. या कार्यक्रमामुळे कल्याण, डोंबिवली शहरातील शिवसेना शिंदे गट आणि भाजपमधील युती घट्ट आणि पक्की झाल्याची चर्चा आहे. या कार्यक्रम सोहळयातील एक वजनदार स्थानिक लोकप्रतिनिधी भाजपच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा होती. या लोकप्रतिनिधीचा शिवसेना शिंदे गटात वेळोवेळी अवमान होत असल्याची चर्चा होती. पण महायुतीमुळे या लोकप्रतिनिधीच्या भाजप पक्षप्रवेशाला विराम मिळाला आहे. प्रवेशासाठी इच्छुक असलेले अनेक पदाधिकारी आता प्रतीक्षा यादीत गेले आहेत.







### ठाकुर्लीत प्रदूषण नियंत्रण मंडळाची कारवाई

# घातक रसायनांचा साठा जप्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली,** ता. १४ डोंबिवलीजवळील ठाकुर्ली, कचोरे गाव हद्दीतील रेल्वे मार्गालगत एका गोदामातून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पथकाने घातक रसायनांचा मोठा साठा जप्त केला आहे. या पिंपांना गळती लागल्याने हे रसायन थेट उल्हास खाडीपात्रात मिसळून प्रदूषण करीत होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कल्याण विभागाचे उपप्रादेशिक अधिकारी उपेंद्र कुलकर्णी यांना मागील आठवड्यात ठाकुर्लीजवळील कचोरे गाव हद्दीत रेल्वेमार्गालगतच्या भागात पिंपांमध्ये रसायनांचा साठा करून ठेवण्यात आला असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे ठाकुर्ली हद्दीत छापा टाकला असता एक बंदिस्त जागेत २५० पिंप आढळून आले. त्यामधील १०० पिंपामध्ये उग्र वासाचे, दुर्गंधीयुक्त घातक रसायन असल्याचे पाहणीत आढळून आले. साठ्यातील पिंपांवर सोलापूर मोहोळ एमआयडीसी आणि भरुचा एमआयडीसीतील कंपन्यांचे पत्ते आढळले आहेत. मग एवढ्या मोठ्या प्रमाणात हा साठा ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथे का आणण्यात आला? या पिंपांमध्ये नेमक्या कोणत्या रसायनाचा साठा आहे, एवढ्या मोठ्या प्रमाणात असे घातक रसायनांचे साठे निवासी विभागाजवळील परिसरात का केले जात आहेत, असे अनेक सवाल उपस्थित होत आहेत.

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com





## वाचक मनोगत

### शस्त्रप्रदर्शनी पाहून जीवनाला दिशा मिळेल

दिल्लीतील 'भारत मंडपम्' येथे 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित भव्य 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'तील 'स्वराजाचा शौर्यनाद' या प्रदर्शन लावण्यात आले आहे. या प्रदर्शनाला स्वामी दीपांकर यांनी भेट दिल्यानंतर प्रभावित होऊन स्वामीजी म्हणाले की, ही शस्त्र प्रदर्शनी पाहून अंगावर रोमांच उभे राहिले. ही शस्त्रप्रदर्शनी पाहून आपल्याला आपल्या पूर्वजांविषयी सार्थ अभिमान वाटेल. तसेच जीवनाला पुढील दिशा मिळेल, असे मला ठाम वाटते. ही प्रदर्शनी पाहण्यासाठी तुम्ही अवश्य या, असे आवाहनही स्वामी दीपांकर यांनी या वेळी केले.

या वेळी प्रदर्शनीचे उद्घाटन करतांना दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा म्हणाले, 'दिल्लीच्या इतिहासात मोगलांचे मोठे योगदान असल्याचे सतत बोलले जाते; मात्र मोगलांचे योगदान जिऱ्याएवढेच होते. त्या तुलनेत मराठे, शीख, जाट यांचे मोठे योगदान होते. त्यांचा मोठा इतिहास आहे. मराठ्यांची परवानगी घेऊनच मोगल दिल्लीच्या लाल किल्ल्यातून एक पाऊल बाहेर टाकत असत. हा खरा इतिहास आहे. इंग्रजांना दिल्ली घेतली, तर मोगलांकडून नव्हे, तर मराठ्यांकडून घेतली; मात्र जाणीवपूर्वक अनेक वर्षे खरा इतिहास लपवला गेला आहे.

**दिल्लीच्या मधोमध भारतीय शस्त्र परंपरा व पारंपरिक शस्त्रे यांचे भव्य संग्रहालय उभारू !**

या शिवकालीन शस्त्रांचे संग्राहक श्री. राकेश धावडे यांनी, शिवकालीन शस्त्रांचे संग्रहालय देशात कुठेच नाही, तर यासाठी कायमस्वरूपी संग्रहालय उभारण्याची विनंती श्री. मिश्रा यांच्याकडे केली असता, मंत्री महोदयांनी त्वरीत 'दिल्लीच्या मधोमध भारतीय शस्त्र परंपरा आणि पारंपरिक शस्त्रे यांचे भव्य संग्रहालय उभारू', असे आश्वासन दिले.

**राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'वन्दे मातरम्'चे प्रदर्शन !**

'वन्दे मातरम्' या राष्ट्रजागृतीच्या पवित्र स्तोत्राला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक प्रसंगी स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरक स्मृती, त्याग, राष्ट्रासाठीचे समर्पण आणि असंख्य क्रांतिकारकांच्या हृदयातील उर्जा जागवणारे प्रदर्शन लावण्यात आले आहे. यात 'वन्दे मातरम्'चा उगम, संघर्षगाथा व राष्ट्रउभारणीतली भूमिका मांडण्यात आली.

या वेळी लेखिका सौ. शेफाली वैद्य, सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारीणी श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, 'सेव्ह कल्चर सेव्ह भारत फाउंडेशन'चे अध्यक्ष आणि भारताचे माजी माहिती आयुक्त श्री. उदय माहूरकर आदी मान्यवर उपस्थित होते. भारत मंडपम्च्या प्रांगणातील हॉल क्र. १२ मध्ये लावण्यात आलेल्या ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन पहायला समस्त दिल्लीकरांनी आवर्जून यावे, असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने या वेळी करण्यात आले.

**श्री. अभय वर्तक,**
**प्रवक्ता, सनातन संस्था,**
**(संपर्क : ९९८७९ २२२२२)**

## नेहरू तारांगणात विद्यार्थ्यांनी घेतले आकाशदर्शन ठामपाकडून विज्ञानविश्वाची रोमांचक सफर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे /अर्जून चेमटे :**

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग व मराठी विज्ञान मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी एक भव्य शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. उपायुक्त शिक्षण सचिन सांगळे , शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे व गट अधिकारी संगीता बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली यु.आर.सी. क्रमांक ०१ अंतर्गत २७८ विद्यार्थी व ७० शिक्षकांनी मुंबई येथील नेहरू तारांगण व नेहरू सायन्स सेंटर येथे शैक्षणिक भेट दिली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी नेहरू तारांगणात आकाशदर्शनाचा अद्भुत अनुभव घेतला. ग्रह-तारे, विश्वाची रचना व खगोलशास्त्राची मूलतत्त्वे प्रत्यक्ष दृश्य माध्यमातून समजल्याने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. त्यानंतर नेहरू सायन्स सेंटरमध्ये ओडिसी शो, SOS शो, 3D शो तसेच विविध विज्ञान प्रदर्शनांचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात केल्या.





यू.आर.सी. समन्वयक पठाण मुश्ताक , रवींद्र पाटील व वर्षा मटकर यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे ही शैक्षणिक भेट अत्यंत यशस्वी ठरली. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व गटप्रमुख, सीआरसी, विज्ञान शिक्षक व शिक्षकवृंदाने अथक परिश्रम घेतले. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा, निरीक्षणशक्ती व नव्या ज्ञानाची ओढ निर्माण झाली असून, शिक्षणाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देणारा हा उपक्रम सर्वार्थाने प्रेरणादायी ठरला आहे.

## भिवंडीत बालिकेवर अत्याचार

### अति.सत्र न्यायालयाने आरोपीला सुनावली 20 वर्षांची शिक्षा...

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी ( प्रतिनिधी)**

भिवंडीत एका पाच वर्षीय बालिकेवर अत्याचार करणाऱ्या एका आरोपीस भिवंडी अतिरिक्त सत्र न्यायालयाने वीस वर्षाच्या कारावास व पाच हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तो न भरल्यास सहा महिन्याची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

मोजिबर बसिबर मुल्ला उर्फ मौजी दादा (वय ३०)असे शिक्षा झालेल्या नराधम आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भिवंडी शहरातील कल्याण रोड टेमघर परिसरात घराबाहेर खेळणाऱ्या पाच वर्षीय चिमुरडीवर शेजारी राहणाऱ्या नराधमाने १५ सप्टेंबर २०१८ रोजी शारीरिक अत्याचार केला होता. याप्रकरणी पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून २१ सप्टेंबर रोजी शांतीनगर पोलिसांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून मोजिबर बसिबर मुल्ला उर्फ मौजी दादा यास अटक केली होती.त्यानंतर पोलिसांनी सखोल तपास करून भिवंडी अतिरिक्त सत्र न्यायालयात आरोपी विरोधात दोषारोप पत्र दाखल केले होते.

अति.सत्र न्यायालय क्रमांक २ चे न्यायाधीश यांच्या समोर पंच, साक्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आले.त्यानंतर न्यायालयाने आरोपी मोजिबर बसिबर मुल्ला उर्फ मौजी दादा यास भा.दंड संहिता कलम ३७६ AB अनव्ये सह पोस्को कलम ४२ अन्वये दोषी ठरवून २० वर्षांचा करावास,५ हजारांचा दंड व दंड न भरल्यास सहा महिन्या चा साधा कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. या गुन्ह्यात न्यायालयात सरकार पक्षातर्फे अति.सरकारी वकील अँड सी.बी.नवले यांनी बाजू मांडली.तर पोलिसांतर्फे पोलिस निरीक्षक राजेंद्र मायने व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास व न्यायालयीन कामात विशेष मेहनत घेतली..

## सेवाभावी आशा सेविका शारदा विशे यांचे निधन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

बचत गटाचे माध्यमातून परिसरातील कुटूंबाला प्रशिक्षण, रोजगार संधी मिळवून देणे,बँक ऑफ महाराष्ट्र (ग्रामीण जाले) अंतर्गत किशोर जि.प.गटांमधील लोकाभिमुख कामे, ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत कुटूंब



नियोजन,डोळ्याचे ऑपरेशन, रोग निदान ई. तसेच शासनाचे आशा सेविका निवृत्त होईपर्यंत केलेले उल्लेखनीय काम,भागवत सप्ताह, हरिपाठ, भजन ई.कार्यक्रमात सदैव तत्पर ,विधवा जीवन जगत असतानाच सार्वजनिक क्षेत्रात कामाची आवड,शांत, संयमी,हसतमुख स्वभावाच्या ह.भ.प.वै.शारदा अंबो विशे (भाभी) वय 60 वर्ष, वाघीवली, ता.मुरबाड यांचे दि.14/12/25 रोजी आजाराने निधन झाले. त्यांचे अंत्ययात्रेत प्रचंड जनसमुदाय जमला होता. त्यांचे मूळचे माहेर म्हसकळ येथील प्रतिष्ठित पाटील घराण्यातील होते. सामाजिक कार्यकर्ते भरत बा. भोईर यांच्या त्या लहान बहीण होत.

## वाशिंद पोलीसांकडून बेपत्ता तरुणाचा शोध

**शहापूर प्रतिनिधी**
**( नरेंद्र पाटील)**

वासिंद येथील सह्याद्री सोसायटी मधील घोडविंदे नगर येथे राहणारा तरुण श्रावण सुदर्शन प्रसाद वय 32 वर्ष हा थोडा बाहेर फिरून येतो असे आईला सांगून गेला तो घरी परत आलाच नाही.

सदरचा तरुण हा दोन दिवस घरी न आल्याने त्याचे वडील सुदर्शन लक्ष्मण प्रसाद यांनी दिनांक 6/11/2025 रोजी वासिंद पोलीस स्टेशन मध्ये मुलगा बेपत्ता असल्याची खबर दिली व तक्रार दाखल केली यावेळी वाशिंद पोलीस स्टेशन मध्ये मिसिंग रजिस्टर नंबर 40/2025 प्रमाणे तक्रार दाखल करून नोंद करण्यात आली सदर बेपत्ता असलेल्या तरुणाचे नाव श्रावण सुदर्शन प्रसाद वय 32 वर्ष असून उंची 5.6 व रंग काळा सावळा असून चेहरा गोळ, केस काळे नाक सरळ



असून त्याने ब्राऊन कलरचा शर्ट चेक्सची हाफ पॅन्ट केली परिधान केली असून त्याला मराठी व हिंदी या भाषांचं ज्ञान अवगत आहे तसेच तो गतिमंद असल्याचेही त्याच्या वडिलांकडून सांगण्यात आले सदरच्या तरुणाचा शोध सुरू असून हा तरुण कुठे आढळल्यास त्वरित मोबाईल क्रमांक 9011648571 या क्रमांकावर संपर्क करून वासिंद पोलीस स्टेशनला खबर द्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक सचिन हुंदळेकर व पोलीस हवालदार वाय आर चव्हाण यांनी केले आहे.

## शिवसेनेतर्फे प्रभाग क्रमांक 30 मध्ये खेळ पैठणीचा लाडक्या बहिणींचा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**डोंबिवली/शरद शहाणे**

डोंबिवली नांदिवली येथे नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात खेळ पैठणीचा, लाडक्या बहिणीचा, वहिनींचा आणि आईचा आवडता कार्यक्रम शिवसेना प्रभाग क्रमांक 30 चे शिवसेना कल्याण ग्रामीण संघटक अर्जुन बाबू पाटील, यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता

शनिवार दिनांक 13. 12 .2025 रोजी सायंकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात महिलांसाठी 21 पैठण्या, त्याशिवाय फ्रिज वॉशिंग मशीन ओवन, घरघंटी एलईडी टीव्ही अशा अनेक वस्तू वस्तू महिलांना स्पर्धेतून मिळाल्या. लकी ड्रॉ चिठ्ठी टाकण्याची वेळ सहा ते आठ वाजेपर्यंत होती सर्व महिलांना आणि कार्यक्रमासाठी आलेल्या नागरिकांसाठी प्रीती भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमात संगीता अनिल म्हात्रे, प्रेमा म्हात्रे, पद्माकर म्हात्रे ,एडवोकेट,ब्रह्मा माळी. दिल खुश माळी नितीन माळी ,अनिल म्हात्रे प्रकाश म्हात्रे हे सर्व ज्येष्ठ पदाधिकारी कार्यक्रमाचे आधारस्तंभ होते अर्जुन पाटील यांचे निकटवर्ती आहेत. अर्जुन पाटील हे वर्षभर सामाजिक उपक्रम राबवतात रक्तदान आरोग्य शिबिर विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू वाटप महिलांना साड्या वाटप






ज्येष्ठांना अनेक प्रकारची शासकीय मदत करतात अर्जून पाटील यांचा तुलसी विवाह हा कार्यक्रम कल्याण तालुक्यात प्रसिद्ध आहे या कार्यक्रमासाठी आमदार खासदार विविध पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित असतात. पैठणीचा खेळ यशस्वी रित्यापार पडण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी आणि महिला आघाडीने मनापासून प्रयत्न केले.

## महाराष्ट्र गौरवरत्न पुरस्काराने सुजाता जाधव यांचा सन्मान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** शहराचे सांस्कृतिक आणि सामाजिक वैभव नव्या उंचीवर नेणारा आणि राज्यस्तरावर पहिलाच भव्य सोहळा म्हणून ओळखला जाणारा 'महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्कार सोहळा' गोविंदराव आदिक सभागृह, श्रीरामपूर येथे दिमाखात पार पडला. विद्याराज फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सुवर्ण सोहळया बाबत प्रमुख आयोजक सुनिल ईश्वर पाटील यांनी सविस्तर माहिती दिली.या पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत आपण केलेल्या उत्तुंग कार्याचा गौरव करण्याचा प्रयत्न होता .राज्यभरात साहित्य, कला, अभिनय, समाजकार्य, संगीत, पत्रकारिता, शिक्षण, वैद्यकीय सेवा, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत महाराष्ट्र गौरव रत्न' या राज्यातील पहिल्या बहिल्या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आला.



लग्नसोहळा ,सांस्कृतिक कार्यक्रम , निरोप समारंभ , वाढदिवस, डबलबारी भजन, नामकरण सोहळा, विविध स्पर्धा अशा विविध पैलू, कार्यक्रमाचे निवेदन आपल्या गोड वाणीने करणा-या पेण एज्युकेशन सोसायटीच्या वरसई पेण येथील पु.न.गोडसे माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ सुजाता सुनील जाधव यांना महाराष्ट्र गौरवरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी आजपर्यंत रायगड, रोहा अलिबाग, खोपोली, पनवेल नवी मुंबई, पुणे ,दौंड मुळशी, अंबरनाथ, बदलापूर, कल्याण, वांगणी.. अशा महाराष्ट्रातील

अनेक ठिकाणी महिला निवेदिका म्हणून उत्तम प्रकारे काम केले आहे.तसेच आपल्या शिक्षिका पेशात कार्यरत राहून आपल्या सुमधुर वाणीने अनेकांची मने जिंकली याबद्दल महाराष्ट्र गौरव रत्न महिला निवेदिका सुजाता जाधव यांना महाराष्ट्र गौरव रत्न हा पुरस्काराने अनेक नामवंत मराठी सिने कलाकार कला क्रीडा,व्यापार सामाजिक शैक्षणिक अध्यात्मिक क्षेत्रातील नामवंत मान्यवरांच्या उपस्थितीत कोपरगाव शिर्डी येथे देण्यात आला.त्यांना मिळालेल्या यशाबद्दल वरसई शाळा व ग्रामस्थ यांच्यासह पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष अॅड मंगेश नेने व सर्व संचालक मंडळ यांनी विशेष अभिनंदन केले.

## एमआयडीसी निवासी विभागात स्वच्छता मोहिमेला सुरुवात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** डोंबिवली एमआयडीसी निवासी विभाग व प्रभाग क्रमांक १९ मध्ये शिवसेनेचे अभिषेक चौधरी यांच्या पुढाकाराने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याअंतर्गत आज एमआयडीसी निवासी विभागातील सर्व्हिस रोड तसेच परिसरात व्यापक स्वरूपात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत परिसरातील रस्त्याच्या कडेला वाढलेली झुडपे हटविण्यात आली असून दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या उद्यानाचीही साफसफाई करण्यात आली. झुडपांमुळे आणि कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे परिसराला आलेले बकाल स्वरूप दूर करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली.

याचवेळी प्रभाग १९ मधील नागरिकांसाठी कास्यथाळी फूट मसाज ही मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात आली.



या आरोग्यविषयक उपक्रमाचा शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. या कार्यक्रमांना परिसरातील नागरिकांसह शिवसेनेचे युवा पदाधिकारी अभिषेक चौधरी तसेच शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांचीही उपस्थिती होती. यावेळी बोलताना अभिषेक चौधरी म्हणाले की, "एमआयडीसी निवासी भागातील नागरिकांशी संवाद साधताना रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात झुडपे वाढल्याने व काही ठिकाणी कचरा टाकला जात असल्याने परिसर अस्वच्छ झाल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. नागरिकांच्या या तक्रारींची तात्काळ दखल घेत शनिवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. झुडपांची छाटणी आणि उद्यानाची स्वच्छता करण्यात आली असून, भविष्यात येथे कोणीही कचरा टाकू नये यासाठी संदेशात्मक फलक लावण्यात येणार आहेत."

परिसर कायमस्वरूपी स्वच्छ व सुशोभित राहावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे सांगत पुढील काळातही शिवसेनेच्या वतीने विविध सामाजिक व जनहिताचे कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## उंदराची 'करामत' अन्...

### पेणच्या स्ट्रॉगरूममधील रहस्यमय घटनेच्या तर्कवितर्कांना पूर्णविराम..!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण( प्रतिनिधी)**

पेण नगर परिषद निवडणुकांच्या मतपेट्या ठेवलेल्या स्ट्राँग रूममध्ये धक्कादायक घटना घडली. स्ट्राँग रूममधील एका टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडलेल्या अवस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पेण शहरात मोठी खळबळ उडाली. मात्र, सीसीटीव्ही फुटेज बघितल्यानंतर खरी परिस्थिती समोर आली. सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर उंदरानेच दरवाजा उघडल्याचे पाहायला मिळाले आहे. फोटो व्हायरल होताच पेणमधील नागरिकांमध्ये शंका-कुशंका व्यक्त केल्या जात होत्या.

स्ट्रांग रूमच्या टेबलाच्या कपाटाचा दरवाजा उघडल्याचे समजताच पेणमधील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या घटनेबद्दल तत्काळ संशय व्यक्त केला आणि सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह उभे केले. हा दरवाजा नक्की कोणी उघडला, याची शहानिशा करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी तातडीने सीसीटीव्ही फुटेज तपासले. फुटेज पाहिल्यानंतर अधिकारी आणि सर्वच पक्षांच्या नेत्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण, चक्क एका उंदराने काही प्रयत्नांनंतर कपाटाच्या हँडलला स्पर्श करून दरवाजा उघडल्याचे स्पष्ट झाले.

पेण तहसील कार्यालयाच्या आवारातील ज्या स्ट्राँग रूममध्ये नगर परिषद निवडणुकांसंदर्भातील महत्त्वाच्या मतपेट्या आणि साहित्य ठेवले आहे, तेथे ही 'उंदराची करामत' घडली. या घटनेनंतर वाढलेला संशय आणि गैरसमज दूर करण्यासाठी पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी तातडीने हस्तक्षेप केला. त्यांनी घटनेची गंभीर दखल घेत उपस्थिताना सीसीटीव्ही फुटेज दाखवले आणि उंदरामुळे हा प्रकार घडल्याचे स्पष्ट केले.

## विद्यार्थ्यांनी स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी वेळेचे नियोजन करावे - डॉ. आनंदराव सूर्यवंशी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

आज समाजात कौटुंबिक व सामाजिक समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. शिक्षणासाठी पोषक वातावरण नसल्याने विद्यार्थी शिक्षणात मागे राहतात. ते शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी होत नाहीत. ते इतर विद्यार्थ्यांबरोबर समरस होत नाहीत . शिक्षकांची त्यांना भीती वाटते .त्यांच्या मनात न्यूनगंड तयार होऊन ते शिक्षणामध्ये मागे पडतात. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक नुकसान होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पुरेसा विकास होत नाही .अशा वेळेस पालक व शिक्षकांच्या व्यतिरिक्त योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता भासते. अन्यथा ते चुकीच्या मार्गावर जातात त्यांचा सामाजिक ,नैतिक आणि भावनिक विकास व्हावा या उद्देशाने दिनांक 12.12.25रोजी मुंबई मनपा चे माजी स्कूल



कौन्सेलर, उप शिक्षण अधिकारी आणि ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ डॉ आनंदराव सूर्यवंशी यांना मार्गदर्शक म्हणून आयडियल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष खंदारे साहेब आणि मुख्य अध्यापिका सौ. सुतार मॅडम यांनी आमंत्रित केले होते.

"विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी वेळेचे नियोजन करावे" .पुढे मुले व मुलींशी सुसंवाद (rapport)साधताना डॉ.सूर्यवंशी यांनी पुढील मुद्द्यावर समुपदेशन केले. विद्यार्थ्यांनी त्यासाठी स्वतःच्या मनावर ताबा/नियंत्रण( Control) ठेवणे आवश्यक आहे.मनाची एकाग्रता (concentration) वाढली,अभ्यासात सातत्य (consistency) ठेवले, तर आपोआप मनात आत्मविश्वास(confidence ) निर्माण होऊ शकतो.सकारात्मक विचार निर्माण झाल्याने, छंदांची जोपासना केल्याने,शिक्षणातून व्यवसायांची गोडी निर्माण होऊ शकते. अशाप्रकारे चारित्र्यसंपन्न विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास शाळेतून होऊ शकतो. शैक्षणिक तणाव नाहीसा झाला की विद्यार्थी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाहीत .



# भाजपतर्फे मोफत महाआरोग्य शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** भारतीय जनता पक्षातर्फे डोंबिवली पश्चिमेतील जय हिंद कॉलनी परिसरात आयोजित मोफत महाआरोग्य शिबिराला स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भाजपचे स्थानिक लोकप्रतिनिधी हृदयनाथ भोईर आणि हर्षदा भोईर यांच्याकडून आयोजित या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. ज्यामध्ये सुमारे 500 हून अधिक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या महाआरोग्य शिबिरामध्ये संपूर्ण वैद्यकीय तपासणी, स्त्रीरोग तपासणी, लहान मुलांची तपासणी, डोळ्यांची तपासणी, युरोलॉजी, हिमोग्लोबिन - ब्लड शुगर, रक्तदाब यांच्यासह बोन डेन्सिटी टेस्टही यावेळी करण्यात आली. याशिवाय 9 ते 14 वर्षे वयोगटातील मुलींसाठी सर्वायकल कॅन्सरची लसही सवलतीच्या दरात देण्यात आली असल्याची भोईर यांनी दिली. तर हे महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यासाठी आयुष हॉस्पिटल, लाईफब्लिस क्लिनिक, सुखकर्ता हॉस्पिटल, पानसरे पॅथोलॉजी, जी. एम. युरोकेअर हॉस्पिटल, ईशा नेत्रालय, सेफ क्लिनिक आणि प्रणिषा हेल्थकेअर यांच्या सहकार्याने राबवण्यात आले. या शिबिर उद्घाटन सोहळ्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजप डोंबिवली पश्चिम मंडळ अध्यक्ष प्रिया जोशी, माजी ज्येष्ठ नगरसेवक नंदू म्हात्रे, प्रकाश भोईर, महाराष्ट्र राज्य रेडिओलॉजी संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई नाशिक महामार्गावर आजपासून चार महिने वाहतुक बदल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मुंबई नाशिक महामार्गावर माजिवडा ते वडपे रस्ता रस्ता रुंदीकरणाचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) हाती घेतले आहे. या कामासाठी उद्या पासून (१५ डिसेंबर) पुढील चार महिने खारेगाव भुयारी मार्गासाठी वाहतुक बदल असणार आहे. त्यामुळे महामार्गावर वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता आहे.

भिवंडी, कळवा, ठाणे, कल्याण, नवी मुंबईच्या दिशेने वाहतुक करणारी हजारो वाहने मुंबई नाशिक महामार्गाचा वापर करतात. मागील काही वर्षांपासून मुंबई नाशिक महामार्गावरील माजिवडा ते वडपे पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचे कार्य एमएसआरडीसीने हाती घेतले आहे. या कामाचा भाग म्हणून येथे आता काही महत्त्वाची कामे केली जाणार आहे. त्यामुळे वाहतुक पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले आहेत. मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव भुयारी मार्गाने खारेगावच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना खारेगाव भुयारी मार्गावर प्रवेशबंदी असेल. येथील वाहने खारेगाव टोलनाका, गॅमन रोड, पारसिक चौक मार्गे वाहतुक करतील. किंवा साकेत येथून खाडी पूल मार्गे वाहतुक करतील. खारेगाव भुयारी मार्गे मुंबई नाशिक मार्गावरून भिवंडी किंवा ठाण्याच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना खारेगाव भुयारी मार्गात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने खारेगाव, पारसिक चौक, गॅमन रोड मार्गे तर ठाण्याच्या दिशेने वाहतुक करणारी वाहने कळवा खाडी पूल मार्गे वाहतुक करतील.



**ठाणे वाहतुक नियंत्रण विभागाने काढलेल्या अधिसूचनेनुसार हे वाहतुक बदल आज, १५ डिसेंबरपासून लागू होणार आहे. तर ९ एप्रिल २०२६ पर्यंत २४ तास वाहतुक बदल कायम असतील. त्यामुळे पुढील चार महिने खारेगाव भुयारी मार्गाचा वापर चालकांना करता येणार नाही.**

# भिवंडी महानगरपालिकेची अंतिम मतदार यादी आज प्रसिद्ध होणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी) :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आदेश महापालिका आयुक्त व निवडणूक विभाग प्रशासनाला दिले आहेत.त्यामुळे भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक विभागाचे प्रमुख अजित महाडीक,नितीन पाटील यांनी निवडणूक मतदार यादी कार्यक्रम-२०२५ कामकाजचा आढावा घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे सुचना दिल्या आहेत.उद्या (15 डिसेंबर ) सोमवार रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणार असल्याची माहिती मनपाचे निवडणूक विभागाचे अधिकारी अजित महाडीक यांनी दिली. राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता मतदार यादीचा कार्यक्रम दिला आहे.त्यानुसार

भिवंडी महानगरपालिका निवडणूक कार्यालयात देखील निवडणूक कामा संदर्भात मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी निवडणूक संदर्भात कर्मचाऱ्यांशी चर्चा करून कामाचा आढावा घेतला. त्यामुळे निवडणूक संबंधाने कार्यालयात हालचाली सुरु झाल्या आहेत. मतदार यादीशी संबंधित सुधारीत कार्यक्रमा नुसार प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन १५/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. तर मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी २०/१२/२५ रोजी प्रसिध्द करणार असल्याची माहिती देण्यात आली. मतदान केंद्र निहाय मतदार यादी २७/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. भिवंडी महापालिकेचे निवडणूक कार्यालय यादी कामकाज व इतर कामाबाबत सक्रिय झाले असून उद्या सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती भिवानी मनपाचे निवडणूक विभाग प्रमुख अजित महाडिक यांनी दिली.

भिवंडी महापालिकेच्या मतदार यादी जाहीर होणार असल्याने शिवसेना,कॉंग्रेस,भाजप,महाराष्ट्र नवनिर्माण सेना,समाजवादी पक्षासह अन्य राजकीय पक्षाचे अध्यक्ष व इच्छुक नगरसेवक पदाधिकाऱ्यांनी निवडणूक मोर्चा बांधणी सुरु केली असून आज इच्छुक उमेदवारांनी महापालिकेत येऊन यादी बाबतीत माहिती घेत आहेत.

# रॅपिडो चालकाचा तरुणीवर अतिप्रसंगाचा प्रयत्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : कल्याणमध्ये रॅपिडो बाईक चालकाने तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याची घटना शनिवारी रात्री घडली आहे. याप्रकरणी या तरुणाला महात्मा फुले चौक पोलिसांनी अटक केली आहे. कल्याण पश्चिम मध्ये एका तरुणीने जिमला जाण्यासाठी रॅपिडो मोटरसायकल बुक केली. सिंधीगेट परिसरामध्ये असलेल्या पोलीस लाईनमध्ये बाईक वरून हा रॅपिडो चालक त्या तरुणीला अंधारात घेऊन गेला. त्या ठिकाणी तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्या तरुणीने आरडा ओरड करत स्वतःची सुटका करत पळ काढला. यावेळी स्थानिक नागरिकांनी रॅपिडो चालकाला चोप दिला. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलिसांनी सिद्धेश परदेशी या 19 वर्षीय रॅपिडो चालकाला अटक करत न्यायालयात हजर केले असून त्याला18 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली.**


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**जाहीर सूचना**

**ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या प्रसिध्दीबाबत.**

मा.राज्य निवडणूक आयोगाने पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक १४.१०.२०२५, दिनांक ०४.११.२०२५, दिनांक १३.११.२०२५, दिनांक २६.११.२०२५ व दिनांक ०९.१२.२०२५ अन्वये जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दिनांक ०१.०७.२०२५ रोजी मा.भारत निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेल्या १४४ कल्याण ग्रामीण, १४६ ओवळा-माजिवडा, १४७ कोपरी पाचपाखाडी, १४८ ठाणे, १४९ मुंब्रा-कळवा या विधानसभेच्या ठाणे महानगरपालिका हद्दीतील मतदार यादी प्रभाग निहाय विभागून ठाणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग मतदार याद्या दिनांक २०.११.२०२५ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, महापालिकेच्या संकेतस्थळावर व संबंधित प्रभाग समिती कार्यालय तसेच स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन दिनांक २०.११.२०२५ ते दिनांक ०३.१२.२०२५ या कालावधीत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. सदर कालावधीत प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादीवर प्राप्त झालेल्या हरकतींची व सूचनांची तपासणी करुन त्यावर आयोगाच्या आदेशानुसार निर्णय घेऊन त्यानुसार सर्व संबंधीत प्राधिकृत अधिकारी तथा उपआयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी प्रभाग निहाय मतदार यादी अंतिम केली आहे.प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७ (अ) अन्वये सर्व संबंधित प्राधिकृत अधिकारी यांनी तयार करुन अधिप्रमाणित केलेल्या प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या दिनांक १५.१२.२०२५ रोजी माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहेत.प्रस्तूत प्रभाग निहाय अंतिम मतदार याद्या **www.thanecity.gov.in** या संकेतस्थळावर आणि निवडणूक विभाग (मुख्यालय) आणि सर्व प्रभाग समिती कार्यालय येथे नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत. कार्यालयीन वेळेत संबंधीत कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध राहतील तसेच निवडणूक विभाग, मुख्यालय येथे सदर मतदार याद्यांची आगाऊ मागणी नोंदविल्यास, नागरी सुविधा केंद्र, महापालिका मुख्यालय येथे शुल्क भरुन विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातील.

ठामपा/पिआरओ/निवडणूक/१०४४/२०२५-२६
दि. १४.१२.२०२५

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**सही/-**
सौरभ राव, भा.प्र.से
प्रशासक तथा आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे


# वाहतुकीचे नियम पाळले तर निश्चितच प्रवासात आपले जीवन सुरक्षित राहील - पोलीस अंमलदार संजय घुडे





**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

शांताराम भाऊ घोलप कला, वाणिज्य व गोटीरामभाऊ पवार सायन्स महाविद्यालय शिवळे यांच्यावतीने मौजे कोळठण येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांचा सात दिवसाचा कॅम्प असून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम करिता महामार्ग पोलीस मदत केंद्र माळशेज नेमणुकीतील पोलीस अंमलदार HC 597 संजय घुडे यांनी रस्ता सुरक्षा अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वाहतुकीचे नियम पाळले तर निश्चितच प्रवासात आपले जीवन सुरक्षित राहील असे मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान शिबिर कोलठण येथे पोलीस अंमलदार संजय घुडे यांनी केले. तसेच अपघात टाळण्याकरता आपण कोणती काळजी घेतली पाहिजे व अपघात झाल्यानंतर परिस्थिती किती कठीण असते वाहतूक नियमन बाबत, वाहतूक सुरक्षा, हेल्मेट घालणे, सीट बेल्ट बांधणे , विमा काढणे, स्पीड मर्यादा, अपघाताचे कारणे, वाहन चालवताना घ्यावयाची दक्षता,साईन बोर्ड, रस्त्यावर टेलर सारखे मोठे वाहन चालले असेल तर आपण काय काळजी घेतली पाहिजे या बाबत संवाद साधला. अपघात टाळण्या संदर्भात विद्यार्थी व शिक्षक वर्ग यांनी विचारलेल्या प्रश्नांचं निरसन केले.

श्रीमती रूपाली अंबुरे मॅडम पोलीस अधीक्षक महामार्ग ठाणे परिक्षेत्र, पोलीस उपाधीक्षक (महामार्ग ठाणे)श्री.विजय गायकवाड, पोलीस निरीक्षक (महामार्ग ठाणे )श्री संतोष खानविलकर आमचे वरिष्ठ अधिकारी हे अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा अनुषंगाने संकल्पना राबविण्यासाठी नेहमीच मार्गदर्शन करत असतात असे संजय घुडे यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले..

सदर कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजना मधील 45 विद्यार्थ्यांनी व शिक्षक व ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला. सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू वानखेडे प्रभारी अधिकारी माळशेज पोलीस मदत केंद्र ,डॉ. प्राचार्य मधुकर बडगुजर , डॉ.उपप्राचार्य गीता विशे , प्रोफेसर वर्मा ,प्राध्यापिका सिंग मॅडम व प्राध्यापक धुमाळ सर शिक्षक वर्ग यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरता मदत केली.

# जीवनदीप महाविद्यालय खर्डीच्या अर्थशास्त्र विभागाची शैक्षणिक सहल यशस्वी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

जीवनदिप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, खर्डी येथील अर्थशास्त्र विभागातर्फे १२ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत ३० विद्यार्थी व २ प्राध्यापक सहभागी झाले. सहलीतील प्रमुख आकर्षण म्हणजे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील अभ्यासभेट. विद्यार्थ्यांनी मॉडेल फार्म, कृषी संग्रहालय तसेच विविध प्रयोगशाळांना भेट देत आधुनिक शेतीत वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

कृषी विद्यापीठाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी सुवर्णदुर्ग समुद्रकिल्ला, कड्यावरचा गणपती (अनजरले), कार्डे बीच तसेच ऐतिहासिक पन्हाले लेणी येथे भेट देऊन किनारी पर्यटन, स्थानिक अर्थव्यवस्था आणि सांस्कृतिक वारशाचा थेट अभ्यास केला. या सहलीमुळे विद्यार्थ्यांना कृषी, पर्यटन, इतिहास आणि स्थानिक उद्योग यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याचे प्रा. रसिका सकपाळ व प्रा. शरद खाकर यांनी सांगितले ही सहल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडविंडे आणि प्राचार्य डॉ. कैलास कळकटे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "मागासवर्गीय निधी"या लेखाशिर्षका उथळसर प्रभाग समिती अंतर्गत प्र. क्र. ११ मध्ये गोकुळदासवाडी येथील शौचालयाचे नुतनीकरण करणे. या कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १५. १२.२०२५ ते दि. २२.१२.२०२५ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे दि. २२.१२.२०२५ रोजी सायं. १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.२३.१२.२०२५ रोजी सायं ११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-उ. प्र.स/१०३३/२०२५-२६ सही/-
दि:१२.१२.२०२५ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**








## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**बांधकाम विभाग**

**ई-निविदा सुचना क्र. १६२. सन २०२५-२६**

खालील काम करण्यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अंदाजित खर्च/निविदा फॉर्म फी/ कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री व स्विकारण्याच अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका निवडणूक-२०२५ करीता प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्र दुरुस्त करणे. | ९, ९७, ००१/- | दिनांक : १५/१२/२०२५<br>दिनांक : २२/१२/२०२५ |

सदर निविदा बाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १५ /१२/२०२५ ते दि.२२/१२/२०२५ रोजी पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थाळावर दि. २२/१२/२०२५ रोजी दु. ४.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

**जावक क्रमांक**
**भिनिशमपा/जसंवि/१५८९**
**दिनांक : १२/१२/२०२५**

**सही/-**
**शहर अभियंता**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**



## कल्याण डोंबिवली महानगरपालिका

**निवडणूक विभाग**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५**
**-: प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रसिद्धीची जाहीर सूचना :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना व सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.०९/१२/२०२५ अन्वये दिलेल्या सुधारीत मतदार यादीच्या कार्यक्रमानुसार दिनांक २०/११/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदार याद्यांवर दिनांक ०३/१२/२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७ अ च्या तरतुदीनुसार ३१ निवडणूक प्रभागांच्या अंतिम मतदार याद्या दिनांक १५/१२/२०२५ रोजी खालील नमुद ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | ठिकाण | निवडणूक प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | '१/अ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, ऑईल मिल जवळ, वडवली, ता. कल्याण. | २, ३, ४ |
| २ | '२/ब' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, संघवी इस्टेट, बारावे रोड, कल्याण पश्चिम. | १, ५, ६, १० |
| ३ | '३/क' प्रभाग क्षेत्र कार्यालय, अग्नीशमन केंद्राजवळ आधारवाडी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण पश्चिम. | ७, ८, ९ |
| ४ | '४/जे' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका. भगवती अभिलाषा कन्व्हेंचर, धनलक्ष्मी अपार्टमेंट जवळ, लोकग्राम रेल्वे टिकीट काऊंटर समोर, लोकग्राम, कल्याण (पुर्व). | ११, १२, १८ |
| ५ | '५/ड' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रभाग कार्यालय), पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण पूर्व. | १३, १४, १५ |
| ६ | '६/फ' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, पीपी चेंबर, भगतसिंग रोड, डोंबिवली पूर्व | २०, २६, २७ |
| ७ | '७/ह' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रेतीबंदर रोड, उमेश नगर, २ पाण्याच्या टाकी जवळ, डोंबिवली पश्चिम. | २१, २२, २३, २४, २५ |
| ८ | '८/ग' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, सुनिल नगर, डिएनसी रोड, बहिणाबाई उद्यानाच्या मागे, डोंबिवली पूर्व. | २८, २९ |
| ९ | '९/आय' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, मंगेशी संस्कार इमारत, विंद्या वासीनी हिंदी शाळेजवळ, खडेगोळवली, विठ्ठलवाडी पूर्व. | १६, १७, |
| १० | '१०/ई' प्रभाग क्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, रिजेन्सी कॉम्प्लेक्स, दावडी रोड, वेंकटेश पेट्रोल पंप जवळ, डोंबिवली पूर्व. | १९, ३०, ३१ |

तसेच ३१ निवडणूक प्रभागांच्या अंतिम मतदार याद्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर व निवडणूक विभाग मुख्यालय, महापालिका भवन, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**ठिकाणः कल्याण**
**दिनांकः १४/१२/२०२५**

**जावक क्रमांक**
**कडोंमपा/जसंवि/मुका/७९०**
**दिनांक : १४/१२/२०२५**

**सही/-**
**(अभिनव गोयल) भा.प्र.से.**
**आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**





# पर्यावरण दक्षता मंडळाच्या वतीने डॉ. कुसुमताई गोखले स्मृती व्याख्यानाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** पर्यावरण दक्षता मंडळ, एन्विरो व्हिजिल, मुंबई विद्यापीठ, असोसिएशन ऑफ टीचर्स इन बायोलॉजिकल सायन्सेस आणि विद्याप्रसारक मंडळ संचलित बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी डॉ. कुसुम गोखले स्मृती व्याख्यान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास पर्यावरण दक्षता मंडळाच्या अध्यक्ष डॉ. मानसी जोशी, उपाध्यक्ष डॉ. संजय जोशी, पर्यावरण दक्षता मंडळाचे सदस्य डॉ. उमेश मुंडले, बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. चित्रा जोशी, डॉ. चैतन्य गोखले प्रमुख वक्त्या डॉ. शीतल पाचपांडे तसेच डॉ. जयश्री मेनन उपस्थित होत्या. डॉ. मानसी जोशी यांनी पर्यावरण दक्षता मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण शाळा, निसर्गमेळा, ग्रीन लव्हर क्लब, ग्रीन लिव्हिंग कन्सल्टन्सी, देवराई, माझा तलाव आणि स्वच्छ खाडी अभियान अशा विविध उपक्रमांची माहिती दिली व सर्वांनी निसर्गाशी नाते जपावे, असे आवाहन केले. यानंतर रुपाली शाईवाले यांनी स्वच्छ खाडी अभियान अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या जनजागृती सत्रे, क्रीक सफारी, निसर्गभ्रमंती, खाडी पाणी नमुना परीक्षण, "माझा तलाव" मोहीम तसेच कल्याण परिसरातील विहीर सर्वेक्षण याबाबत माहिती दिली. "खाडी स्वच्छ करण्यापेक्षा खाडीत कचरा टाकणे थांबवले, तर खाडी आपोआप स्वच्छ राहील," असा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. तसेच यावर्षी मुंबई विद्यापीठासोबत २६ वी परिषद आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.



# मनसेनेच्या 'रोजगार व स्वयंरोजगार' राज्य उपाध्यक्षपदी रूपेश पाटील

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा तरुण चेहरा म्हणून ओळखले जाणारे तसेच मनसेचे संस्थापक अध्यक्ष राजसाहेब ठाकरे, अमित ठाकरे, रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांचे अतिशय विश्वासू सहकारी राहिलेले रुपेश पाटील यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या 'रोजगार व स्वयंरोजगार' विभागाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विभागाचे महाराष्ट्र अध्यक्ष महेंद्र बैसाणे यांच्या हस्ते ही नियुक्ती देण्यात आले. पक्षाच्या स्थापनेपासून चर्चेत असलेला चेहरा आहे. पण कोरोना काळापासून यांची ओळख जिल्ह्याबाहेर तसेच महाराष्ट्रात पोहोचली. कोरोना काळात त्यांनी गोरगरीब गरजू अशा हजारो लोकांची सेवा केली. गोरगरिबांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न यावर ते नेहमीच आवाज उठवत असतात. मराठी माणसावर जिथे कुठे अन्याय होताना दिसेल तिथे सर्वात अगोदर मनसेचा दणका दाखवताना आपल्याला नेहमीच दिसतात. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन आज त्यांना पक्षाने मोठी जबाबदारी देऊ केली आहे.

यावेळी महेंद्र बैसाने ( महाराष्ट्र अध्यक्ष, रोजगार रोजगार विभाग), सौ. सिद्धी आंगणे (सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य), सोनी पी. बेबी (चिटणीस, महाराष्ट्र राज्य), संजय जाधव (माजी पोलीस अधिकारी), हिरामण जेधे, रोहित पाटील, विशू गिरी, ओमकार कचरे, पारस दरेकर, रोहन पाटील, निकेश पाटील उपस्थित होते.

# जिल्ह्यातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी लागू करा !

## शिक्षक भारती संघटनेची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण**
**(नरेंद्र पाटील)**

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी व पेसा क्षेत्रातील शिक्षक व कर्मचारी यांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळावा अशी मागणी शिक्षक भारती संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

आदिवासी व पेसा क्षेत्रात कार्यरत असलेल्या शिक्षकांना शासनाने एकस्तर वेतन श्रेणी देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु काही अटी व त्रुटींमुळे शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणी लागू होत नव्हती किंबहुना आश्रम शाळेमध्ये एकस्तर वेतनश्रेणी लागू केली. परंतु पुन्हा वसूल करण्याचा तगादा हा शिक्षकांच्या पाठिमागे लागला होता असे तारमळे यांनी म्हटले आहे.

नुकताच मुंबई हायकोर्ट यांनी रेट पेटिशन नुसार निर्णय दिला असून नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व पेसा क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षकांना सदर वेतनश्रेणी लागू करून फरकासह देण्यात यावी असे कोर्टाचे आदेश झाले आहेत. तसेच पालघर जिल्ह्यासाठी सुद्धा कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेशित केले आहे.

ठाणे जिल्ह्यात शहापूर तालुका हा 100% आदिवासी व पेसा क्षेत्रात मोडत आहे. तसेच, मुरबाड तालुका 43.65% तर भिवंडी तालुका 30.57% मोडत असल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी देण्याबाबत व शाळा स्तरावर शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावेत अशा प्रकारचे आदेश ठाणे शिक्षणाधिकारी यांनी द्यावेत अशी मागणी शिक्षक भारती संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनावेळी एकनाथ तारमळे यांच्यासह सुरेश विशे, रमेश तारमळे, नामदेव बांगर, सचिन शेलवले, दिनेश वाघ आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# गोपीनाथ मुंडे यांनी फक्त कार्यकर्तेच नाही तर नेते घडविले - अनिल फड




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समिती कल्याण यांच्यावतीने गोपीनाथ मुंडे जयंती उत्सव समिती 2025 चे अध्यक्ष आत्माराम फड यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या 76 जयंतीनिमित्त वंजारी भवन कल्याण येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डीएनटी फाउंडेशन दिल्लीचे कार्यवाह अनिल फड प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ते पुढे म्हणाले लोकनेते गोपीनाथ मुंडे हे वंजारी समाजासाठी दैवत आहेत, त्यांनी वंजारी समाजासाठी दिलेले योगदान सर्वश्रुत आहे परंतु त्यांनी वंजारी समाजाव्यतिरिक्त धनगर, माळी, बंजारा, दलित, पारधी अशा विविध बहुजन समाजासाठी देखील तेवढेच योगदान दिले. त्यांनी या सर्व बहुजन समाजातील कार्यकर्त्यांना तुम्ही नेते बना आणि सत्तेत सामील व्हा असे वेळोवेळी आवाहन केले. तसे त्यांना महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देऊन नेते केलेही. आजही महाराष्ट्रात त्यांनी घडवलेले नेते विविध क्षेत्रात आपलं कर्तृत्व गाजवत आहेत. हे नाकारता येणार नाही. यावेळी प्रमुख पाहुणे विक्रम बोडके यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांच्या आठवणी कथन केल्या.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी कवी रमेश आव्हाड यांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आव्हाड यांनी आपल्या विविध कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपीनाथ मुंडे जयंती समितीचे अध्यक्ष आत्माराम फड यांनी करुन आगामी काळात गोपीनाथ मुंडे यांची जयंती भव्य स्वरूपात साजरी करणार असल्याचे सांगितले.

यावेळी माळी समाजाचे कार्यकर्ते व गोपीनाथ मुंडे फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत माळी यांनी मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देऊन शेतकऱ्यांचे कैवारी गोपीनाथ मुंडे यांचे नाव कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एका प्रवेशद्वाराला द्यावे अशी मागणी केली. संस्थेचे अध्यक्ष शंकरराव आव्हाड यांनी देखील गोपीनाथ मुंडे यांच्या काही आठवणी सांगितल्या व गोपीनाथ मुंडे आणि वंजारी सेवा समिती यांचे ऋणानुबंध उलगडून सांगीतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस अर्जुन डोमाडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी रामनाथ दौंड, भाऊसाहेब आंधळे, माधवराव आव्हाड, किरण दराडे, योगेश भाबड, माधव दराडे, अनिल दौंड, वंदना सानप, लता पालवे यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय लोक अदालतीत 17 हजार 920 प्रकरणांचा निपटारा
# 61 कोटी 13 लाख रुपयांची तडजोड रक्कम वसूल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी) :** दाखलपूर्व व प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा तसेच वाद सामोपचाराने मिटावेत, या उद्देशाने जिल्ह्यात १३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये वादपूर्व व दाखल अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या माध्यमातून पक्षकारांना एकूण ६१ कोटी १३ लाख १९ हजार ३८५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा दिवाणी न्यायाधीश श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी दिली.





राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार जिल्ह्यातही प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती डॉ. सृष्टी निळकंठ यांच्या मार्गदर्शनाखाली लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीचे उद्घाटन मा. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून करण्यात आले.

जिल्ह्यात आयोजित लोक अदालतीमध्ये एकूण ७३ हजार ६३३ वादपूर्व प्रकरणे व १३ हजार ८९९ प्रलंबित खटले अशी ८७ हजार ५३२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १२ हजार ७५१ वादपूर्व व ५ हजार १६९ प्रलंबित अशी एकूण १७ हजार ९२० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले.

### ■ लोक अदालतीत ११ जोडप्यांचा संसार जुळला

लोक अदालतीत कौटुंबिक वादांमध्ये सामंजस्य घडून आल्याने जिल्ह्यातील ११ जोडप्यांचा संसार पुन्हा सुरळीत झाला. यामध्ये कर्जत-२, पाली-२, रोहा-२, पेण-२, मुरुड-१ व अलिबाग-२ जोडप्यांचा समावेश आहे. प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्रीमती डॉ. सृष्टी निळकंठ यांनी मनोमिलन झालेल्या जोडप्यांचे अभिनंदन केले.

### ■ मोटार अपघात प्रकरणांत ३ कोटी ८३ लाखांची भरपाई

राष्ट्रीय लोक अदालतीदरम्यान जिल्ह्यातील एकूण ४४ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ३ कोटी ८३ लाख ८४ हजार ७२३ रुपये इतकी नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली. जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये एकूण २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या मिटविण्यात आली.

**या राष्ट्रीय लोक अदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील संघटना, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधीक्षक व पोलीस कर्मचारी तसेच सर्व पक्षकारांनी दिलेल्या सहकार्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी अध्यक्ष तथा प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती डॉ. सृष्टी निळकंठ आणि सचिव श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी आभार मानले.**

# आगरी समाजाची संस्कृती दाखविणारा आगरी महोत्सव डोंबिवलीत सुरू



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कुणाल म्हात्रे**

**कल्याण :** आगरी समाजातील खाद्य संस्कृती व समृद्ध परंपराचे नव्या पिढीला दर्शन घडविण्याबरोबरच समाजाच्या प्रगतीसाठी `आगरी युथ फोरम'ने सुरू केलेला अखिल भारतीय आगरी महोत्सव शुक्रवारी सायंकाळी थाटात सुरू झाला. माजी कसोटी क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार रवींद्र चव्हाण आणि केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर मान्यवरांनी आगरी संस्कृतीचा गौरव केला.

डोंबिवलीतील संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलात सुरू झालेला आगरी महोत्सव १९ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. या २१ व्या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी शरद पाटील आहेत. या वेळी माजी खासदार जगन्नाथ पाटील, प्रल्हाद शास्त्री महाराज आचार्य, गंगाराम शेलार, वास्तूविशारद तायशेटे, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, महापालिका सचिव किशोर शेळके यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

`आगरी युथ फोरम'च्या माध्यमातून डोंबिवलीतील आगरी समाज हा प्रगतीच्या वाटेवर आहे. समाजाने आता शिक्षणाबरोबरच खेळालाही प्राधान्य द्यावे. डोंबिवलीत क्रिकेटवगळता अन्य खेळांमधून आंतरराष्ट्रीय दर्जावर ठसा उमटविणारे खेळाडू उदयाला आले नाहीत. भारतात २०३० मधील कॉमनवेल्थमध्ये डोंबिवलीतील चार ते पाच खेळाडू असतील, यासाठी आगरी युथ फोरमने पुढाकार घ्यावा, असे आवाहन क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी यांनी केले.

**प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, क्रिकेटपटू निलेश कुलकर्णी, आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडून आगरी संस्कृतीचा गौरव**

आमदार रवींद्र चव्हाण यांनी आगरी महोत्सवाचे संयोजनाचे कौतुक केले. तसेच आगरी समाजाची सर्वांगीण प्रगती होत असून, महोत्सवातून समाजाला दिशा मिळाली, असे नमूद केले. संत सावळाराम म्हात्रे महाराजांपासून प्रेरणा मिळण्यासाठी महापालिकेतर्फे १० एकर जागेत भव्य स्मारकाचे काम सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहोत, अशी माहिती आयुक्त गोयल यांनी दिली.महोत्सवाचे अध्यक्ष शरद पाटील यांनी महोत्सवानिमित्ताने झालेल्या कार्याचा आढावा घेतला. कल्याण-डोंबिवलीतील ७८ हजार इमारती अनधिकृत ठरविल्यानंतर त्या वाचविण्यासाठी आगरी युथ फोरमने पुढाकार घेतला होता, असे नमूद करून संत सावळाराम महाराजांच्या स्मारकासाठी १० एकर जागा देण्याच्या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार मानले. पांडुरंग म्हात्रे यांनी आभार मानले.

संत ज्ञानेश्वरांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्ताने यंदा आगरी महोत्सवाला भेट देणाऱ्या मान्यवरांना ग्रंथराज ज्ञानेश्वरीची भेट तर आगरी समाजातील ५० गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येईल, असे महोत्सवाचे अध्यक्ष शरद पाटील यांनी सांगितले.

# महात्मा गांधी प्राथमिक शाळेत भरली शिक्षण परिषद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**कुणाल म्हात्रे**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग, केंद्र शाळा भावे सभागृह 7 अंतर्गत शिक्षण परिषद शनिवारी महात्मा गांधी विद्यामंदिर प्राथमिक शाळा डोंबिवली पश्चिम येथे भरवण्यात आली. त्यावेळी प्रमुख पाहुणे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे, व्याख्याते ॲड. नियती शेंडगे व जेष्ठ पत्रकार कृष्णात कदम यांच्याहस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन करण्यात आले. याप्रसंगी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुचिता राठोड, केंद्रप्रमुख उदयभान गुप्ता आणि शा. स. अध्यक्ष प्रदीप गवळी तसेच इतर शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, परिसरातील नागरिक व पालक आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा कुलकर्णी यांनी केले तसेच ललिता कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने ईशस्तवन आणि स्वागत गीत सादर केले. शाळेचे मुख्याध्यापक अजयकुमार जोगी यांनी सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार केला आणि आपल्या प्रास्ताविकात त्यांनी शिक्षण परिषदेचे महत्त्व स्पष्ट केले. या कार्यक्रमातून चांगल्या उत्तम प्रतीचे विचार रुपी बीज सर्व शिक्षक घेऊन जातील आणि त्याचे विद्यार्थी रुपी वटवृक्षात रूपांतर करतील अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशासनाधिकारी भारत बोरनारे यांनी आपल्या भाषणात शिक्षण विभागाची प्रतिमा उंचावली पाहिजे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे व आपल्या मराठी शाळेतून उच्चपदस्थ विद्यार्थी घडले पाहिजेत त्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावे असे कळकळीचे आवाहन सर्वांना केले. ॲड. नियती शेंडगे यांनी सकारात्मक शिस्ती बद्दल सांगताना विद्यार्थ्यांना भावनिक धक्का लागणार नाही याची काळजी घेण्याचे सुचवले. बालमनावर हळुवार प्रयत्न करत स्वयंशिस्त लावणे आवश्यक आहे असे नमूद करतानाच बालक शोषण विरोधातील कायदे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवेत असे प्रतिपादन केले कृष्णात कदम यांनी मुख्यमंत्री.. माझी शाळा सुंदर शाळा.. या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन करत या योजनेतील विविध पैलूंविषयी मार्गदर्शन केले.

# लोखंडी सळ्या व गॅसचा अपहार !
# ठाणे ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई !

## 1 कोटी 56 लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**नरेंद्र पाटील/ शहापूर**

सध्या मुंबई आग्रा महामार्गावर अवैधरित्या लोखंड सळई व गॅसचा अपहार करून मोठ्या प्रमाणात विक्री करण्याच्या घटना घडत आहेत त्या विरुद्ध ठाणे ग्रामीण पोलीसांनी धडक कारवाई कारवाई करून जवळपास 1 कोटी, 56 लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील

मौजे लाहेगाव येथील एकता ढाब्याजवळ करण्यात आली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी.एस.स्वामी यांनी ठाणे ग्रामीण जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात छुप्या रीतीने बेकायदेशीर अवैध धंदे करणाऱ्या इसमा विरुद्ध विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे याबाबत अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची वेगवेगळे पथके तयार करून त्यांना सूचना व मार्गदर्शन करून प्रभावी व परिमाणक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्या अनुषंगानेच दिनांक 10 डिसेंबर रोजी पोलिस पथकाने गुप्त बातमीदार मार्फत माहिती काढून शहापूर विभागातील मौजे लाहेगाव येथील एकता ढाब्याजवळ एकता ढाब्याचे मालक राघवेंद्र हरीपाल सिंग व ट्रेलर चालक तसेच इतर साथीदार असे एकत्र येऊन आपसात संगनमत करून कट रचून ट्रेलर मधील लोखंडी सळीचा माल अपहार करून वाशिंद व पडघा येथील लोखंडी सळीच्या दुकानात विक्री करतात तसेच भारत पेट्रोलियम या अत्यावश्यक सेवेतील टँकर मधील गॅस इतर सिलेंडर मध्ये काढून कंपनी मालकाचा विश्वासघात करीत असल्याने सदर ठिकाणी पथकाने छापे टाकून अवैद्य लोखंडी सळीचा अपहार होत असलेल्या 4 ट्रेलर, ,1 आयशर टेम्पो व इतर वस्तू असा

1 कोटी 38 लाख 90 हजार 981 किंमतीचा मुद्देमालसह राघवेंद्र हरीपाल सिंग व त्याचे इतर साथीदार अशा बारा इसमान विरुद्ध त्याचबरोबर अत्यावश्यक सेवेतील भारत पेट्रोलियमचा टँकर मधील गॅस इतर सिलेंडर मध्ये काढत असलेल्यात एक गॅस टँकर, एक सुपर कॅरी टेम्पो, 27 सिलेंडर व इतर वस्तू असा 17 लाख 74 हजार 300 रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून राघवेंद्र हरीपाल सिंग व इतर त्याचे इतर साथीदार अशा चार इसमान विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

या दोन्ही कारवाईत एकूण जवळपास 1 कोटी 56 लाख 65 हजार 281 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून राघवेंद्र सिंग यांसह इतर चौदा इसमांविरुध्द शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे तर सदरची कारवाई ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ.डी. एस.स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024